# दी नॅशनल को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

नोंद. कार्यालय : २१४, रहेजा सेंटर, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
वसुली विभाग : प्लॉट क्र. ८/सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, नविन पनवेल (पश्चिम)-४१० २०६.
ईमेल पत्ता : recovery@ncbmumbai.com दु. क्र. ०२२-२७४५८६२८

## लिलाव विक्रीची सूचना

०१.०७.२०२४ पासून संपूर्ण कर्ज थकबाकीच्या वसुली पर्यंत पुढील व्याज आणि खर्च, आकार व परिव्यय यासह एकत्रित रित्या ३०.०६.२०२४ रोजीसच्या रु. ३,९२,४८,७६३.००/- (रुपये तीन कोटी ब्याण्णव लाख अठ्ठेचाळीस हजार सातशे त्रेसष्ट मात्र) च्या वसुलीसाठी मे. देवाशिष डेव्हलपर्स प्रा. लि. द्वारे त्यांचे संचालक श्री. मोहनलाल प्रल्हादका आणि श्री. रोनक प्रल्हादका यांना मंजूर केलेल्या अग्रिमांसाठी एक तारण म्हणून दी नॅशनल को- ऑप. बँक लि. च्या नावात मे. देवाशिष डेव्हलपर्स प्रा. लि. द्वारे त्यांचे संचालक श्री. मोहनलाल प्रल्हादका आणि श्री. रोनक प्रल्हादका यांनी गहाण ठेवलेल्या खालील मिळकतींची (तारण मत्ता) सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व त्या अंतर्गत बनवलेले नियम यांचे अंतर्गत जाहीर लिलावाने विक्री. बँकेकडे सदर तारण मत्तेचा प्रत्यक्ष कब्जा आहे.

| मिळकतीचे वर्णन | | राखीव किंमत (रु.लाखांत) | इसारा अनामत (रु. हजारात) | निरीक्षणाची आणि लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| सीटीएस क्र-२१,२१/१ ते २१/१८, किंवा अंतिम प्लॉट क्र-३७, ईस्टर्न प्लाझा, दफ्तरी रोड, एस. के. पाटील हॉस्पीटल जवळ, गाव कुरार, मालाड (पू), मुंबई-४०० ०९७ | | | | निरीक्षण - दिनांक : ०७.०८.२०२४ स. ११.०० ते सायं. ५.०० आणि लिलाव दिनांक : १२.०८.२०२४ स. ११.३० दी नॅशनल को-ऑप बँक लि., दुकान क्र. १ आणि २, तळ मजला, रॉयल कॉटेज सीएचएस लि., कस्तुरबा क्रॉस रोड क्र.-२, बोरिवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६ येथे |
| | दुकान क्र.- १०५ ४थ्या मजल्यावर क्षेत्र: ३३७ चौ. फू. बीयुए | ७७,५१,०००.०० | ७,७५,१००.०० | |
| | दुकान क्र.- ११६ ५व्या मजल्यावर क्षेत्र: १६३ चौ. फू. बीयुए | ४०,९५,०००.०० | ४,०९,५००.०० | |
| | दुकान क्र.- ११७ ५व्या मजल्यावर क्षेत्र: २३५ चौ. फू. बीयुए | ५४,०५,०००.०० | ५,४०,५००.०० | |
| | एकूण क्षेत्र ३ दुकाने ७३५ चौ. फू. बीयुए | १,७२,५१,०००.०० | १७,२५,१००.०० | |

लिलावाचे ठिकाण: दी नॅशनल को-ऑप बँक लि., दुकान क्र. १ आणि २, तळ मजला, रॉयल कॉटेज सीएचएस लि., कस्तुरबा क्रॉस रोड क्र.-२, बोरिवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६
ईमेल: recovery@ncbmumbai.com

**अटी आणि शर्ती:-**

१. बोली प्रपत्र आणि विक्री च्या अटी आणि शर्ती प्लॉट क्र. ८-सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, नविन पनवेल (पश्चिम), नवी मुंबई-४१० २०६ येथे स्थित बँकेच्या वसुली विभागाचे कार्यालय येथून कोणत्याही कामाच्या दिवशी स. ११.०० ते सं. ५.०० दरम्यान मिळू शकतील.

२. लिलावाच्या दिवशी बोलीत भाग घेण्यासाठी बोलीदाराने व्यक्तिशः हजर राहावे आणि मुंबई येथे देय दी नॅशनल को- ऑप. बँक लिमिटेड च्या नावे काढलेल्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेड्युल्ड बँकेच्या पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट किंवा आरटीजीएस/एनईएफटीच्या माध्यमातून येथे वर वर्णन केलेल्या इ.अ.र. सह मोहोरबंद पाकिटातून बोली ०९.०८.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सं. ५.०० पूर्वी प्लॉट क्र. ८-सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, नविन पनवेल (पश्चिम), नवी मुंबई-४१० २०६ येथे स्थित दी नॅशनल को-ऑप. बँक लि. च्या शाखा कार्यालयात प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पोहोचली पाहिजे. इ.अ.र. शिवाय च्या आणि/किंवा राखीव किंमती खालील बोली विचारांत घेतल्या जाणार नाहीत. बोलींची मोहोरबंद पाकिटे वर दिलेल्या लिलावाच्या ठिकाणी आणि वेळी उघडली जातील.

३. अन्य व्यक्ती किंवा एखाद्या कॉर्पोरेट मंडळाच्या वतीने बोली प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याचा/तिच्या नावात बोलीदारांने मंजूर केलेल्या लेखी प्राधिकृती/मंडळाच्या ठरावाला सादर केले पाहिजे.

४. बोलीदारांना बोली सोबत पॅन कार्ड/वास्तव्याचा पुरावा यासारख्या केवायसी दस्तावेजांची स्व-साक्षांकित छाया प्रत आणि एक पार पत्र आकाराचे छायाचित्र सादर करावे लागेल आणि लिलावाच्या वेळेस पडताळणीसाठी त्याच्या मूळ प्रती सादर कराव्या लागतील.

५. मिळकतींची विक्री काटेकोरपणे "जसे आहे जेथे आहे तत्वाने आणि जसे आहे जे आहे तत्वाने" होईल आणि इच्छुक बोलीदारांनी मिळकतींच्या संबंधातील कोणतेही दावे, भार, कर, दायित्व, देणी आणि/किंवा अन्य कोणतीही उपार्जित दायित्व याबाबत स्वतः चौकशी करावी आणि ती यशस्वी बोलीदारांना भरावी लागतील. मिळकतीवरील सध्याची उपार्जित दायित्वे बँकेला माहित नाहीत.

६. लिलाव प्रक्रियेतील बोली प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या सर्वोच्च बोली रकमेपासून सुरू होईल आणि त्यानंतर बोलीदारांना किमान रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) ने बोली वाढवू दिले जाईल.

७. यशस्वी बोलीदारांना त्यांची बोली स्वीकारल्यावर ताबडतोब म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामाच्या दिवसांच्या सं. ५.०० पूर्वी बोलीची २५% रकम (इ.अ.र. सह) प्रदान करावी लागेल आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांत भरावी लागेल.

८. जर यशस्वी बोलीदारांनी वरील खंड (७) मध्ये नमूद केल्या प्रमाणे २५% बोली रकम प्रदान करण्यांत कसूर केली तर त्यांनी जमा केलेली इसारा अनामत रकम जप्त होईल आणि विक्री रद्द समजली जाईल. त्याचप्रमाणे विक्री निश्चितीच्या तारखेपासून १५ दिवसांत उर्वरित ७५% रक्कम प्रदान करण्यांत बोलीदारांनी कसूर केल्यास, बँक बोलीची २५% रकम जप्त करेल.

९. विक्री मंजुरी झाल्यावर प्रदानाच्या अटींचे पालन करण्याकरिता प्राधिकृत अधिकारी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ नुसार यशस्वी बोलीदारांच्या नावे विक्री प्रमाणपत्र जारी करेल आणि यशस्वी बोलीदारांना यशस्वी बोलीदारांच्या नावात विक्री प्रमाणपत्र नोंदणीकृत करून घेण्यासाठी सर्व कर, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क व अनुषंगिक परिव्यय प्रदान करावे लागतील. संपूर्ण बोली रकम प्राप्त झाल्यावरच प्राधिकृत अधिकारी उक्त मिळकतींचा कब्जा सुपूर्द करतील.

१०. कोणतेही कारण न देता कोणताही प्रस्ताव/बोली स्वीकारणे किंवा फेटाळणे किंवा लिलाव पुढे ढकलणे/रद्द करणे तसेच कोणत्याही पूर्व सूचने शिवाय विक्रीच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा देखील करण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवत आहेत.

११. बँकेला भार माहित नाही.

१२. मिळकतीचे तपशील मिळवण्याकरिता इच्छुक बोलीदार दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८६२८ वर दी नॅशनल को-ऑप. बँक लिमिटेड शी निगडित प्राधिकृत अधिकारी, श्री. मंगेश गावडे यांच्याशी संपर्क साधू शकतात.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २६.०७.२०२४

सही/- प्राधिकृत अधिकारी पद: व्यवस्थापक
दी नॅशनल को-ऑप. बँक शी निगडीत